**<u>ठळक बातम्या</u>**

- दिल्ली आणि बिहारमधे भूकंपाचे धक्के, सुरक्षेच्या उपाययोजनांचं पालन करण्याचं प्रधानमंत्र्यांचं नागरिकांना आवाहन

- हिंद महासागर ही जगाची जीवनरेखा असून, या क्षेत्रातील देशांमध्ये संपर्क यंत्रणा अधिक पारदर्शी करण्याची गरज असल्याचं परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांचं प्रतिपादन

- अमेरिकेतून पाठवणी करण्यात आलेल्या ११२ भारतीयांचं विमान अमृतसरमधे दाखल

- इस्रोकडून सॉलिड रॉकेट मोटर्ससाठी जगातला सर्वात मोठा दहा टन वजनाचा प्रोपेलेंट मिक्सर विकसित

**आणि**

- FIH प्रो लीगमध्ये भारतीय पुरुष हॉकी संघाचा स्पेनवर २-० नं विजय

**<><><><><>**

राजधानी नवी दिल्लीत आज पहाटे पाच वाजून ३६ मिनिटांनी भूकंपाचे झटके बसले. त्याची तीव्रता ४ रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाचा केंद्रबिंदू दिल्लीजवळ धौल कुवा इथं जमिनीच्या खाली पाच किलोमीटरवर होता. यात जीवित अथवा वित्त हानी झाल्याचं वृत्त नाही.

भूकंपानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावर पोस्ट करत नागरिकांना शांतता बाळगण्याचं, सुरक्षेच्या उपायोजनांचं पालन करत सर्तक राहण्याचं आवाहन केलं आहे. प्रशासकीय यंत्रणा परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचंही प्रधानमंत्र्यांनी पोस्टमध्ये नमूद केलं आहे. दरम्यान, दिल्ली

पोलिसांनीही नागरिकांना सावधगिरी बाळगत सतर्क राहण्याचं आवाहन केलं आहे. तसंच आणिबाणीची परिस्थिती उद्भवल्यास ११२ या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा असं सांगितलं आहे.

दरम्यान, **बिहार**च्या सिवान आणि आसपासच्या जिल्ह्यातही आज सकाळी भूकंपाचे धक्के बसले. आज सकाळी आठ वाजून दोन मिनिटांनी भूकंपाचे धक्के जाणवले असून भूकंप मापकावर त्याची तीव्रता ४ रिश्टर स्केल इतकी नोंदवण्यात आली. भूकंपाचा केंद्रबिंदू सिवानपासून १० किलो मीटर अंतरावर असल्याची माहिती पटणा इथल्या भारतीय हवामान विज्ञान विभागानं दिली.

**<><><><><>**

हिंद महासागर ही जगाची जीवनरेखा असून, या क्षेत्रातील देशांमध्ये परस्पर सहमतीने संपर्क यंत्रणा अधिक पारदर्शी आणि सहकार्यपूर्ण असली पाहिजे, असं प्रतिपादन परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी केलं. ओमान मधील मस्कत इथं आयोजित आठव्या हिंद महासागर संमेलनात ते काल उद्घाटन सत्रात बोलत होते. भारत मध्य पूर्व युरोप आर्थिक कॉरिडोर आणि भारत - म्यानमार - थायलंड त्रिपक्षीय राजमार्ग या दोन्ही योजनांना सामूहिक संपर्क योजना मानण्यात यावं असंही जयशंकर यावेळी म्हणाले.

हिंद महासागर संमेलनात परराष्ट्र मंत्र्यांनी काल मॉरिशस, मालदिव, नेपाळ, भूताना आणि श्रीलंकेच्या परराष्ट्रमंत्र्यांची भेट घेतली. मॉरिशसचे परराष्ट्रमंत्री धनंजय रितेश रामफुल यांचीही जयशंकर यांनी भेट घेतली. उभय देशांमधील मैत्रीपूर्ण संबंध अधिक दृढ करण्यावर भर देण्याच्या दृष्टीनं दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली.

त्यानंतर जयशंकर यांनी मालदीवचे परारराष्ट्र मंत्री अब्दुल्ला खलील यांची भेट घेतली. या भेटीत भारत आणि मालदिव यांच्यात सहकार्यानं केल्या जाणाऱ्या विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाल्याचं एस जयशंकर यांनी समाजमाध्यमावरील

पोस्टमध्ये म्हटलं आहे. श्रीलंकेचे परराष्ट्रमंत्री विजेता हेराथ यांच्याशी झालेल्या बैठकीत जयशंकर यांनी श्रीलंकेतील आर्थिक परिस्थिती सुधाणाऱ्यासाठी आणि त्यांच्या प्रगतीसाठी भारताकडून सर्वतोपरी मदत केली जाईल, असं आश्वासन दिलं. तसंच श्रीलंकेला विविध क्षेत्रात भारताकडून सहकार्य केलं जाईल असंही परराष्ट्रमंत्र्यांनी सांगितलं. नेपाळचे परराष्ट्रमंत्री आरजू राणा देऊबा यांच्याशी झालेल्या भेटीत द्विपक्षीय सहयोग आणि दोन्ही देशांतील संबंध  अधिक दृढ करण्यासाठी कसे प्रयत्न केले जातील,यावर चर्चा झाली. जयशंकर यांनी ओमान, इराण ब्रूनेई आणि भूतानच्या परराष्ट्र मंत्र्यांचीही भेट घेतली.

**<><><><><>**

अमेरिकेत कथितरित्या अवैध पद्धतीने गेलेल्या ११२ भारतीयांना घेऊन आलेलं विमान अमृतसर इथल्या विमानतळावर काल रात्री उशीरा उतरलं. भारतीयांची अमेरिकेतून पाठवणी करणारं हे तिसरं विमान आहे. यातले ४४ नागरिक हरियाणामधले, ३३ गुजरातमधले, ३१ पंजाब, २ उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशातले प्रत्येकी एक जण आहे. या प्रवाशांची औपचारिक तपासणी झाल्यानंतर त्यांना घरी सोडण्यात येईल.

**<><><><><>**

नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर यापुढे कोणताही अनुचित प्रकार घडू नये े म्हणून उत्तर रेल्वेनं काही उपाययोजना केल्या आहेत. नवी दिल्ली रेल्वे स्थानकांवर प्लॅटफॉर्म तिकिटांच्या विक्रीवर तात्पुरती बंदी घातली असून पुढील एका आठवड्यासाठी नवी दिल्ली रेल्वे स्थानकावर दुपारी ४ ते रात्री ११ वाजेपर्यंत प्लॅटफॉर्म तिकिटे दिली जाणार नाहीत. तसंच प्रयागराजला जाणाऱ्या सर्व विशेष गाड्या प्लॅटफॉर्म क्रमांक १६ वरून सुटतील आणि प्रवाशांचा प्रवेश आणि निर्गमन अजमेरी गेटकडून होईल. याशिवाय, नवी दिल्ली स्थानकावर रेल्वे संरक्षण दल

आणि राज्य रेल्वे पोलिस दलाची तैनात वाढवण्यात आली आहे. भाविकांच्या सोयीसाठी उत्तर रेल्वे आज पाच विशेष गाड्या चालवणार आहे. गर्दीच्या परिस्थितीत प्रवासी रेल्वेच्या हेल्पलाइन क्रमांक १३९ चा वापर करू शकतात.

<><><><><>

प्रार्थना स्थळे अधिनियम, १९९१ कायद्याला आव्हान देणाऱ्या अनेक याचिका दाखल होत असल्याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं आज तीव्र नाराजी व्यक्त करत आज यासंदर्भातली सुनावणी पुढे ढकलली. इंदिरा जयसिंह यांनी दाखल केलेल्या याचिकेवरच्या सुनावणीवेळी सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती संजय कुमार यांच्या पीठानं या संदर्भात आणखी याचिका दाखल झाल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली.

या संदर्भात दाखल झालेल्या याचिकांची संख्या पाहता तात्काळ सुनावणी घेणं शक्य नाही. काही याचिकांची सुनावणी तीन न्यायाधीशांच्या पीठासमोर झाली असून त्यावर पुन्हा सुनावणी घेणं शक्य नसल्याचं सरन्यायाधीशांनी यावेळी सांगितलं.

<><><><><>

भारतानं सॉलिड रॉकेट मोटर्ससाठी जगातला सर्वात मोठा दहा टन वजनाचा प्रोपेलेंट मिक्सर विकसित केला आहे. हे तंत्रज्ञान भारतीय अंतराळ संशोधन संस्थेच्या सतीश धवन अंतराळ केंद्रानं, बंगळुरू इथल्या केंद्रीय उत्पादन तंत्रज्ञान संस्थेच्या सहकार्यानं विकसित केलं आहे. या मिक्सरचे वजन १५० टन आहे. या मिक्सरमुळे रॉकेट प्रक्षेपणासाठी आवश्यक असलेल्या सॉलिड प्रोपेलेंट घटकांचे अचूक आणि सुरक्षित मिश्रण सुनिश्चित होते. हे तंत्रज्ञान अंतराळ तंत्रज्ञानात भारताच्या वाढत्या स्वावलंबनाचं प्रतीक आहे, असं इस्त्रोने म्हटले आहे.

<><><><><>

उत्तर प्रदेशातील प्रयागराज इथं महाकुंभ मेळ्यासाठी जाणाऱ्या नागरिकांच्या सोईसाठी आणि अतिरिक्त गर्दीचं नियंत्रण करण्यासाठी रेल्वे प्रशासनाने काल चार विशेष रेल्वेगाड्या सुरू केल्या. दुपारी ३ ते रात्री ९ दरम्यान या गाड्या सोडण्यात येणार आहेत. आज पाच गाड्या सोडण्यात येणार आहेत . दरम्यान, काल महाकुंभ मेळ्यात संध्याकाळी ६ वाजेपर्यंत १ कोटी ३६ लाखांपेक्षा जास्त भाविकांनी स्नान केलं. १३ जानेवारीपासून कालपर्यंत ५२ कोटी ८३ लाख भाविकांनी स्नान केल्याची नोंद झाली आहे.

<><><><>

कर्नाटकात म्हैसूर इथल्या विश्वेश्वरैया नगरमध्ये एका कुटुंबातले चार जण मृतावस्थेत आढळले. कुटुंबातल्या पतीनं आपली पत्नी, मुलगा आणि आईला विष पाजून नंतर स्वतःला गळफास लावला अशी शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. या घटनेची सखोल चौकशी सुरू असल्याचं पोलिसांनी सांगितलं.

<><><><>

भारतीय पुरुष हॉकी संघानं काल संध्याकाळी भुवनेश्वरच्या कलिंगा स्टेडियमवर स्पेनवर २-० असा विजय मिळवून FIH प्रो लीगमध्ये पहिला गुण मिळवला आहे. पहिल्या सत्रात अनेक संधी गमावल्यानंतर सामन्यावर भारतानं आपलं वर्चस्व कायम ठेवलं. गोलकीपर कृष्ण बहादूर पाठकनं काही गोल होण्यापासून रोखत उत्कृष्ट बचाव केला. भारतीय पुरुष संघाचा सामना उद्या जर्मनीशी होणार आहे.

महिलांच्या हॉकीत इंग्लंडविरुद्धच्या सामन्यात भारताचा शूटआउटमध्ये १-२ असा पराभव झाला. निर्धारित वेळेत भारतानं आणि इंग्लंडसोबत २-२ अशी बरोबरी झाली होती. भारताकडून नवनीत कौर आणि ऋतुजा पिसाळ यांनी गोल केले. भारतीय महिला संघाचा सामना उद्या स्पेनशी होईल.

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१७ फेब्रुवारी २०२५ सोमवार

**<><><><><>**

सीमा सुरक्षा दल आणि बॉर्डर गार्ड बांगलादेश अर्थात बीजीबी यांच्यातील ५५ वी महासंचालकस्तरीय सीमा समन्वय परिषद बीएसएफतर्फे उद्यापासून नवी दिल्लीमध्ये आयोजित करण्यात आली असून ती २० फेब्रुवारीपर्यंत चालेल. या परिषदेत महासंचालक दलजीतसिंग चौधरी यांच्या नेतृत्वाखाली, बीएसएफचं शिष्टमंडळ, बीजीबीचे महासंचालक मेजर जनरल मोहम्मद अशरफ उज्जमान सिद्धीकी यांच्या नेतृत्वाखालील बीजीबी शिष्टमंडळाची भेट घेणार आहे.

**//<><><><><>//**